महाराष्ट्र शासन

क्र. अधापु-२०१९/ प्र.क्र. १०५/ना.पु.२२
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९.

प्रति,

१) नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
२) जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, अहमदनगर, नंदुरबार, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, गडचिरोली.
३) जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, अहमदनगर, नंदुरबार, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, गडचिरोली.
४) अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे, सोलापूर.

विषय :- अतिवृष्टी व पूरामुळे बाधित झालेल्या कुटुंबांना मोफत अन्नधान्याचा लाभ देण्यासाठी माहे ऑगस्ट, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ करिता मासिक नियतन.

संदर्भ :- १) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. सीएलएस-२०१८/प्र.क्र.२२५/म-३, दि.८.३.२०१९.
२) शासन परिपत्रक समक्रमांक दि. ७.८.२०१९
३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. सीएलएस-२०१९/प्र.क्र.१६५/म-३, दि.२९.८.२०१९.
४) केंद्र शासनाचे क्र. २/महाराष्ट्र/२०१५- बीपी-III(Pt.), दि. १२.९.२०१९ चे पत्र.

अतिवृष्टी व पुरामुळे आपत्कालिन परिस्थिती उद्भवून निराधार होणाऱ्या कुटुंबांना प्रति कुटुंब १० किलो गहू व १० किलो तांदूळ मोफत पुरविण्यास महसूल व वन विभागाच्या दि. ८.३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने अतिवृष्टी व पुरामुळे बाधित कुटुंबांना मोफत अन्नधान्याचा लाभ देण्याकरिता केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दिनांक १२.९.२०१९ च्या पत्रान्वये माहे ऑगस्ट, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीकरिता अन्नधान्याचे नियतन प्राप्त झाले आहे.

२. महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन दि. २९.८.२०१९ च्या शासन निर्णयानुसार पात्र बाधित कुटुंबांना मोफत अन्नधान्य वितरीत करण्यासाठी याद्वारे माहे ऑगस्ट, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ करिता अन्नधान्याचे मासिक नियतन मंजूर करण्यात येत असून जिल्हानिहाय पात्र बाधित कुटुंबांच्या प्रमाणात अन्नधान्याच्या मासिक नियतनाचा तपशिल सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आला आहे. पात्र बाधित कुटुंबांना संदर्भाधीन दि. २९.८.२०१९ च्या शासन निर्णयानुसार विहित केलेल्या परिमाणाच्या मर्यादेत गहू व तांदळाचे वाटप करावे.

३. सदर अन्नधान्याचे वितरण करताना संदर्भाधीन दि. ७.८.२०१९ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे. महसूल यंत्रणेने पात्र ठरविलेल्या कुटुंबांनाच सदर अन्नधान्याचे वितरण करावयाचे आहे. त्यादृष्टीने करीता महसूल यंत्रणेशी समन्वय साधून त्यांच्याकडून पात्र बाधित कुटुंबांच्या प्राप्त झालेल्या यादीनुसार अन्नधान्य वितरणाकरीता कार्यपद्धती निश्चित करुन विहीत परिमाणात

अन्नधान्याचे वितरण करण्यात यावे. पात्र बाधित कुटुंबांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील शिल्लक अन्नधान्यातून अन्नधान्याचे वितरण केले असल्यास त्या अन्नधान्याचे समायोजन याद्वारे देण्यात येत असलेल्या नियतनातून अन्नधान्याची उचल करुन करण्यात यावे. सदर अन्नधान्याचे समायोजन करण्याची जबाबदारी सर्वस्वी संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उप नियंत्रक यांची राहील.

४. पात्र बाधित कुटुंबांना अन्नधान्य देण्याकरिता ते केंद्र शासनाकडून <u>MSP/MSP derived</u> दराने खरेदी करण्यात यावे. केंद्र शासन / भारतीय अन्न महामंडळाकडून ₹ १७३५.० प्रति क्विंटल दराने गहू व ₹ २६४१.८ प्रति क्विंटल दराने "अ" दर्जाचा तांदूळ खरेदी करण्यात यावा. सदर अन्नधान्य लाभार्थ्यांना मोफत वितरीत करण्यात यावे. भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त झालेल्या दरांबाबतच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

५. केंद्र शासनाच्या दि. १२.९.२०१८ च्या पत्रात नमूद केल्यानुसार सदर अन्नधान्याच्या नियतनाकरीता भारतीय अन्न महामंडळाकडे रकमा जमा करण्याची व अन्नधान्याच्या उचलीची मुदत केंद्र शासनाच्या संदर्भाधीन पत्रापासून ३० दिवस म्हणजेच दि. ११.१०.२०१९ पर्यंत राहील. तत्पूर्वी संपूर्ण अन्नधान्यासाठी आवश्यक असलेल्या रकमा भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करुन अन्नधान्याची उचल विहीत मुदतीत करण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उप नियंत्रक यांची राहील.

६. शासनाचे सदर नियतन मंजूरीचे आदेश उपआयुक्त (पुरवठा) यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. सदर आदेश प्राप्त झाल्यावर उप आयुक्त (पुरवठा) यांनी त्यांच्या अखत्यारीतील जिल्ह्यांना त्यांच्या स्तरावरुन नियतनाबाबत आदेश काढावेत. नियतन मंजूरीचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे अन्नधान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले, ही सबब विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

७. भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून गहू व तांदूळ स्विकारताना शासनाच्या निर्देशानुसार नमुने घेऊन संयुक्तपणे धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी. यासंबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सदर संयुक्त तपासणीच्या वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची नावे, त्यांचे पद व तपासणीचा दिनांक व स्थळ याबाबतची जिल्हानिहाय माहिती अन्नधान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर तत्काळ शासनास सादर करावी. सदर माहिती पुढील महिन्याच्या शासनाच्या नियतन आदेशापूर्वी प्राप्त न झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

८. सोबतच्या विवरणपत्रातील नियतनाच्या तक्त्यामध्ये दर्शविलेल्या परिमाणानुसारच पात्र बाधित कुटुंबांना अन्नधान्याचे वितरण करणे अनिवार्य आहे. पात्र बाधित कुटुंबांना सदर धान्याचे वाटप विहित परिमाणात होत असल्याची खातरजमा करण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात. अन्नधान्याचे वाटप विहित परिमाणात होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

९. सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश, २०१५ मधील तरतुदीनुसार सोबत जोडलेल्या नमुन्यात "उपयोगिता प्रमाणपत्र" सादर करणे अनिवार्य आहे. तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उप नियंत्रक यांनी रास्त भाव दुकानदारांकडून अन्नधान्याचे वाटप करण्यात आलेल्या

पात्र बाधित कुटुंबातील कुटुंब प्रमुखाचे नाव, त्यांचा शिधापत्रिका क्रमांक किंवा अन्य ओळखपत्र क्रमांक, वितरीत करण्यात आलेल्या अन्नधान्याचे प्रमाण याबाबतच्या नोंदी प्राप्त करुन घ्याव्यात.

१०. माहे ऑगस्ट, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीसाठी उक्त पात्र बाधित कुटुंबांना नियतनानुसार गहू व तांदुळाचा साठा मुक्त करण्याच्या सूचना भारतीय अन्न महामंडळास स्वतंत्रपणे देण्यात आल्या आहेत.

११. उपरोक्त सूचनांव्यतिरित स्थानिक गरजा विचारात घेऊन आवश्यकता वाटल्यास नियंत्रक शिधावाटप/जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावरून संबंधितांना अतिरिक्त सूचना द्याव्यात.

(हेमंत वाडीकर)
कार्यासन अधिकारी

सोबत :- १. विवरणपत्र.
२. उपयोगिता प्रमाणपत्र नमुना

प्रत:- १) उप आयुक्त (पुरवठा), कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर.
त्यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे आदेश सर्व संबंधित जिल्हयांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्हयांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करण्यात यावी.

२) उपसंचालक, नागरी पुरवठा,पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई, यांनी प्रस्तुत नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील प्राप्त करुन घ्यावा.

३) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांनी प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करावी.

(हेमंत वाडीकर)
कार्यासन अधिकारी

प्रत :- १) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई, यांना केंद्र शासनाच्या दि. १२.९.२०१८ च्या पत्रात नमूद केलेल्या अन्नधान्याच्या दराच्या अनुषंगाने व उचलीच्या अनुषंगाने माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना.

२) निवड नस्ती (कार्यासन, नापु-२२)

अतिवृष्टी व पूरामुळे बाधित झालेल्या कुटुंबांना वितरीत करावयाच्या अन्नधान्याच्या मासिक नियतनाबाबतचे विवरणपत्र (माहे ऑगस्ट, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९)

| अ.क्र | जिल्हा | बाधित कुटुंबे | नियतनाचे परिमाण (किलो) | | दरमाह मासिक नियतन (मे.टन) | | एकूण अन्नधान्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | |
| १ | कोल्हापूर | १०२५५७ | १० | १० | १०२५.५७ | १०२५.५७ | २०५१.१४ |
| २ | सांगली | ८७९३९ | १० | १० | ८७९.३९ | ८७९.३९ | १७५८.७८ |
| ३ | सातारा | १९७६ | १० | १० | १९.७६ | १९.७६ | ३९.५२ |
| ४ | पुणे (DSO) | १९७६ | १० | १० | १९.७६ | १९.७६ | ३९.५२ |
| ५ | पुणे(FDO) | ६१२३ | १० | १० | ६१.२३ | ६१.२३ | १२२.४६ |
| ६ | सोलापूर (DSO) | २२९९ | १० | १० | २२.९९ | २२.९९ | ४५.९८ |
| ७ | सोलापूर (FDO) | १२९९ | १० | १० | १२.९९ | १२.९९ | २५.९८ |
| ८ | मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र "ग" परिमंडळ | १५२ | १० | १० | १.५२ | १.५२ | ३.०४ |
| ९ | मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र "फ" परिमंडळ | २७०३१ | १० | १० | २७०.३१ | २७०.३१ | ५४०.६२ |
| १० | पालघर | ४०२७ | १० | १० | ४०.२७ | ४०.२७ | ८०.५४ |
| ११ | ठाणे | ७४८९ | १० | १० | ७४.८९ | ७४.८९ | १४९.७८ |
| १२ | रायगड | १२९४२ | १० | १० | १२९.४२ | १२९.४२ | २५८.८४ |
| १३ | रत्नागिरी | ५९४ | १० | १० | ५.९४ | ५.९४ | ११.८८ |
| १४ | सिंधुदुर्ग | १६०५ | १० | १० | १६.०५ | १६.०५ | ३२.१० |
| १५ | नाशिक | ५९०० | १० | १० | ५९.०० | ५९.०० | ११८.०० |
| १६ | नंदुरबार | ११७८ | १० | १० | ११.७८ | ११.७८ | २३.५६ |
| १७ | अहमदनगर | २६२० | १० | १० | २६.२० | २६.२० | ५२.४० |
| १८ | औरंगाबाद | ५३८ | १० | १० | ५.३८ | ५.३८ | १०.७६ |
| १९ | गडचिरोली | ११०५ | १० | १० | ११.०५ | ११.०५ | २२.१० |
| Total | | २,६९,३५० | | | २६९३.५० | २६९३.५० | ५३८७.०० |

# Government of Maharashtra

No.- Adhapu-2019/C.R. 105/CS-22.
Food, Civil Supplies & Consumer Protection Department, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralay Annex, Mumbai-400 032
Date :- ~~15th~~ 18th September, 2019.

To,

The General Manager (Mah),
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD Complex, Dattapada Road, Rajendra Nagar,
Borivali (E), Mumbai – 400 066

**Sub :- Allocation of Foodgrains to Families affected by heavy rainfall & flood for the month August, 2019 to October, 2019.**

**Ref :-** 1) Govt. of India letter No.2/Maharashtra/2015-BP-III(Pt). Dt. 12.9.2019.
2) State Govt. Letter of even no. Dtd. 18th September, 2019.

Sir,

Government of India (GOI) vide its above referred letter dated 12.9.2019 has sanctioned additional allocation of wheat and rice for **Families affected by heavy rainfall & flood** at **MSP/MSP derived rates**. Accordingly, State Government has issued districtwise allocation orders for the same for the month **August, 2019 to October, 2019** vide above referred letter dated 18th September, 2019 (copy enclosed). State Government has also instructed its field authorities to purchase foodgrains at **MSP/MSP derived rates** i.e. Rs. 1735.0 per Quintal for Wheat and Rs. 2641.8 per Quintal for "A" Grade Rice & Rs. 2611.94 per quintal for common rice.

Validity period for deposit of cost and lifting of the above additional allocation will be 30 days from the date of issue of GOI's above referred letter.

You are therefore requested to release the allocated quota to the nominees of District Collectors as per the statement attached under intimation to this Government. You are requested to give instructions to your regional offices to allow these district officials to lift the foodgrains for the flood affected people at the caliest this being the very sensitive issue.

Yours faithfully,

**(Hemant Wadikar)**
**Section Officer, Government of Maharashtra**

Copy to: 1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S. & C.P. Dept, Mumbai.
2) Select file, Desk CS-22.

C:\USERS\PRIYANKAP PATIL\DESKTOP\SHASHANK\SHASHANK\FARMER ALLOCATION\FARMER 2018-19\ADDITIONAL ALLOCATION FOR FLOOD RELIEF, 2019.DOCX